नि. फौ.ख. क्र. ३३५/२०२२
सरकार वि. अश्वीन.
सा.क्र. ०२
निशाणी क्रं. २१

**अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्रमांक ०२ चे शपथेवर बयान सुरू**

शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | :– भा.द.वि.कलम ३५४ चे असल्यामुळे पिडीतेच्या वडीलांचे नाव गोपनिय ठेवण्यात आले, |
| माझे वय | :– ४८ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– शेती, |
| राहणार | :– XXX, ता.मोताळा, जि.बुलडाणा. |

**(सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता चव्हाण यांचे मार्फत)**

१) मी आरोपीला ओळखतो. आज रोजी आरोपी हा न्यायालयात हजर आहे. आरोपी हा माझे गावातील आहे. पिडीता ही माझे मुलगी आहे. घटना ही अंदाजे ३ ते ४ वर्षापुर्वी दुपारी माझे शेतात मौजे काळेगाव येथे घडली होती. आरोपी व माझ्या दरम्यान शेताच्या कारणावरुन बोलचाल झाली होती. या व्यतीरीक्त काहीही झालेले नाही. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते. असे काही घडले नव्हते की, आरोपीने वाईट उददेशाने माझे मुलीचा हात पकडला होता.

**(साक्षीदार हा त्याने दिलेल्या पुर्वीच्या बयाणाशी विसंगत बयाण देत असल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासणीमध्ये विचारता येवु शकणारे प्रश्न विचारण्याची तोंडी परवानगी मागीतली – परवानगी देण्यात आली.)**

२) हे म्हणणे खरे नाही की, घटना ही दिनांक १४/०८/२०२२ रोजी दुपारी २.३० वाजता माझे राहते घरी, मौजे काळेगाव येथे घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझे मुलीला मला असे सांगितले की, मी वसंता काकर यांचे दुकानातुन तंबाकुची पुडी घेउन येतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनतर मी सदर दुकानात गेले. हे म्हणणे खरे नाही की, काही वेळाने घरातुन ओरडण्याचा आवाज आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी पळत घराकडे आलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझे घरात होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे मुलीचा

हात पकडल्याचे पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीला घराचे बाहेर ओढले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, अशा आशयाचे बयाण मी पोलीसांना दिला होता. हे मला माहिती नाही की, माझे बयाणातील अधोरेखांकीत भाग 'अ' पोलीसांनी का लिहीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अधोरेखांकीत भाग 'अ' मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपी दरम्यानचा वाद न्यायालयाबाहेर संपुष्टात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात आपसी समझोता लेख दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला समझोता लेखातील मजकुर वाचुन दाखविल्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**(आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ के.व्ही. परमार यांचे मार्फत)**

३)　　　नाकारला.

**पुर्नःतपास काही नाही.**

दिनांक १७/०४/२०२६.

| | |
|---|---|
| सा.वा.दा.ब.अ.क.के. | श्रवणोत्तर स्विकृत, |
| स्वा. | स्वा. |
| (स.श्री. गायकवाड) | (स.श्री. गायकवाड) |
| प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१ | प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१ |
| मोताळा, जिल्हा बुलडाणा. | मोताळा, जिल्हा बुलडाणा. |